दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hindupraksashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

नाशिकमध्ये कांद्याच्या दरात घसरण पण ग्राहकांना दिलासा नाही

नाशिक : जवळपास महिनाभर कांद्याने घाऊक बाजारात उच्चांकी दर गाठलेला असताना आता नाशिकमध्ये घाऊक कांद्याचे दर घसरले आहेत. कारण कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून होणाऱ्या नवीन आवकेमुळे देशातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ असलेल्या लासलगाव येथील दरांवरील ताण कमी झाला आहे. सप्टेंबरच्या सुरुवातीला लासलगावमध्ये चांगल्या प्रतीचा कांदा घाऊक दरात ५५ रुपये प्रति किलो तर निकृष्ट कांदा हा ४५ रुपये प्रति किलोने विकला जात होता.

राज्यातील सर्व शहरांत 16 पासून 10 टक्के पाणीकपात

मुंबई : एल निनोच्या प्रभावामुळे राज्यात यंदा पर्जन्यमानात घट झाल्याने उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत १६ ऑक्टोबर २०२६पासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच धरणनिहाय आणि वापरनिहाय नियोजन करून ३१ ऑगस्ट २०२७पर्यंत पिण्याच्या पाण्याचा साठा राखीव ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी सोमवारी दिली.

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. ०६ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १६५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

सोनाली बेंद्रे यांनी केला 'सोहळा'चा ट्रेलर लॉन्च

मुंबई, 5 ऑक्टोबर 2026: सोनाली बेंद्रे यांनी 'सोहळा'चा ट्रेलर लॉन्च केला आहे. प्रस्तुतकर्ता म्हणून हा त्यांचा पहिलाच चित्रपट आहे. ट्रेलरमधून प्रेक्षकांना 13 वर्षीय पश्याच्या जगाची पहिली झलक पाहायला मिळते. आपल्या आयुष्यातील सर्वात खास दिवसांपैकी एका दिवसासाठी पश्या तयारी करत आहे. हा चित्रपट 16 ऑक्टोबर 2026 रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे नाव महाराष्ट्रातील एका पारंपरिक वयात येण्याच्या विधीवरून घेण्यात आले आहे. या विधीच्या केंद्रस्थानी एक साधी पण भावनिक परंपरा आहे एक तरुण मुलगा पहिल्यांदाच आपल्या वडिलांच्या चपला घालतो. हा क्षण त्याच्या बालपणातून पुढे जात मोठं होण्याच्या दिशेने टाकलेल्या पहिल्या पावलाचे प्रतीक मानला जातो. 13 वर्षांचा पश्या बालपणीच्या स्वप्नांनी आणि उत्साहाने भरलेला आहे.

नवरात्री उत्सवांमध्ये 'दिल से' नाचायला सज्ज व्हा

पुणे - दांडियाच्या टिपऱ्या बाहेर निघाल्या की पुण्याच्या उत्सवी उत्साहाला सीमा उरत नाही. यंदा भारतातील आघाडीचे मनोरंजन व्यासपीठ बुकमायशो "दिल से नवरात्री" घेऊन येत आहे. यात जोशपूर्ण गरबा आणि दांडिया रात्रींपासून ते लाईव्ह संगीत आणि मित्र-परिवारासाठी रंगतदार अनुभवांपर्यंत प्रत्येक प्रकारचा उत्सव एकत्र आणला आहे. विविध शहरांमध्ये १०००+ नवरात्री कार्यक्रम आणि २०+ आकर्षक बँक ऑफर्ससह, शोधण्यासाठी, नियोजनासाठी आणि बुक करण्यासाठी प्रत्येकासाठी काहीतरी आहे तर मग, तुमचा उत्सवी ग्रुप जमवा, तुमच्यातील सर्वोत्तम कौशल्य दाखवा आणि जल्लोषासाठी सज्ज व्हा. पुण्यात होणारे काही सर्वात रोमांचक नवरात्री कार्यक्रम, आता बुकमायशोवर बुक करण्यासाठी उपलब्ध!

टर्मिनल 1बी च्या उत्तर विभागाच्या पुनर्विकासाला सुरुवात

मुंबई: अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड संचालित मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड मुंबई विमानतळाच्या टर्मिनल 1बी च्या उत्तर विभागाच्या पुनर्विकासाला सुरुवात करणार आहे. 60 वर्षे जुन्या या इमारतीशी संबंधित सुरक्षेच्या चिंतेमुळे सदर टर्मिनलचा टप्प्याटप्प्याने पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबई विमानतळाच्या दरवर्षी सुमारे 55 दशलक्ष प्रवाशांपैकी केवळ सुमारे 5 दशलक्ष प्रवाशांची (सुमारे 9%) वाहतूक तात्पुरती बंद ठेवण्यात येणार आहे.

रोजगारांना चालना देण्यासाठी सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना

भुज : अदाणी समूहाची कौशल्यविकास आणि क्षमता निर्माण करणारी संस्था अदाणी स्किल्स अँड एज्युकेशन (ASE) आणि कच्छ विद्यापीठाने आज गुजरातमधील भुज येथील विद्यापीठाच्या परिसरात ग्रीन एनर्जी क्षेत्रासाठी सेंटर ऑफ एक्सलन्स (CoE) चे उद्घाटन केले.गेल्या दोन वर्षांत कच्छ जिल्ह्यात अदाणी समूहाच्या ग्रीन एनर्जी क्षेत्रातील उपक्रमांमुळे 21,000 हून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण झाले आहेत.

उत्कृष्ट कामगिरीसाठी पाच 'मेडॅलियन फॉर एक्सलन्स'

बेंगळुरू: स्किल इंडिया मिशन आणि देशाच्या विकसित भारत 2047 या संकल्पनेप्रती आपली बांधिलकी अधोरेखित करत, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज जाहीर केले की, 22 ते 27 सप्टेंबर 2026 दरम्यान चीनमधील शांघाय येथे आयोजित 48व्या वर्ल्डस्किल्स स्पर्धा 2026 मध्ये कंपनीच्या पाच कर्मचाऱ्यांना 'मेडॅलियन फॉर एक्सलन्स'ने सन्मानित करण्यात आले. मेकॅट्रॉनिक्स, ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग आणि रोबोट सिस्टीम्स इंटिग्रेशन या तीन कौशल्य प्रकारांमध्ये सहभागी होत टीकेएम च्या कर्मचाऱ्यांनी भारताने मिळवलेल्या एकूण 20 'मेडॅलियन फॉर एक्सलन्स'पैकी पाच पदके पटकावली.



बंद घर फोडून साडेपाच लाखांचे दागिने लांबवले; तीन अज्ञात चोरट्यांचा धुमाकूळ, सीसीटीव्ही फुटेज आले समोर

पैठण रोडवरील साई सृष्टी पार्कमधील घटना; 50 वर्षे जुने सोन्या-चांदीचे दागिने लंपास, सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

विशेष बातमीदार

छत्रपती संभाजीनगर : शहर व परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ दिवसेंदिवस वाढत चालला असून नागरिक भयभीत झाले आहेत. पैठण रोडवरील 'साई सृष्टी पार्क' या निवासी संकुलात भरदिवसा बंद घराचे कुलूप तोडून तीन अज्ञात चोरट्यांनी तब्बल ५ लाख ४१ हजार रुपये किमतीचे जुने सोन्या-चांदीचे दागिने व वस्तू लंपास केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात तीन अज्ञात भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार स्नेहा सुधीर बोरगावकर (वय ४५, रा. साई सृष्टी पार्क, पैठण रोड) या २१ ऑगस्ट २०२६ पासून आपल्या घराला कुलूप लावून समर्थ नगर येथील दुसऱ्या घरी राहण्यासाठी गेल्या होत्या. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता त्यांच्या शेजारी राहणाऱ्या छाया घुगळे यांनी बोरगावकर यांना फोन करून घराचा दरवाजा उघडा असून सामान अस्ताव्यस्त पडल्याची माहिती दिली.

माहिती मिळताच बोरगावकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली असता, घराचे मुख्य कुलूप तोडलेले दिसले. बेडरूममधील कपाटाचे लॉकर उचकटून चोरट्यांनी ५० वर्षांपेक्षा जुने कौटुंबिक सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याचे निष्पन्न झाले.

सीसीटीव्हीमध्ये कैद झाला चोरट्यांचा थरार घटनेनंतर अपार्टमेंटमधील सीसीटीव्ही (CCTV) कॅमेऱ्यांची पाहणी केली असता, ४ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे ०४.४५ ते ०५.३० वाजेच्या सुमारास तीन अनोळखी इसम इमारतीत प्रवेश करताना आणि घरफोडी करून पसार होताना स्पष्टपणे दिसून आले आहेत.

लांबवलेल्या ऐवजाचा तपशील: चोरट्यांनी कपाटातून ६० हजारांचे २ तोळ्यांचे सोन्याचे मणीमंगळसूत्र, ९० हजारांचे सोन्याचे नानु सेट, ९० हजारांच्या दोन बांगड्या, ६० हजारांचे सोन्याचे चार जोड झुमके, ३० हजारांचे २ किलो चांदीचे ग्लास व ट्रे यासह एकूण ५,४१,०००/- रुपये मूल्याचे विविध मौल्यवान दागिने लांबवले आहेत.

सातारा पोलिसांत गुन्हा दाखल या प्रकरणी स्नेहा बोरगावकर यांच्या तक्रारीवरून सातारा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६३२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३३१(४), ३०५(अ) आणि ३(५) अन्वये तीन अनोळखी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) देशमूख यांच्या आदेशाने पुढील तपास एपीएम/एपीआय घोरपडे करत आहेत.

दुष्काळाच्या छायेतही तरुणाईच्या कलेला बहर; केंद्रीय युवक महोत्सवाला उत्साहात सुरुवात

नागराज मंजुळे यांच्या हस्ते उद्घाटन; 107 महाविद्यालयांतील साडेसहाशे कलावंतांचा सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : मराठवाड्यावर दुष्काळाचे सावट असतानाही तरुणाईच्या कलागुणांना खंड पडलेला नाही. कलेच्या माध्यमातून पावसासाठी साद घालतानाच आपल्या प्रतिभेची ताकद आणि जिद्द दाखवत १०७ महाविद्यालयांतील सुमारे ६५० विद्यार्थी कलावंतांनी केंद्रीय युवक महोत्सवात सहभाग नोंदविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सोमवारी साधेपणाने या महोत्सवाचा प्रारंभ झाला.

प्रख्यात अभिनेते-दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ. विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. अभिनेता व विद्यापीठाचा माजी विद्यार्थी कैलास वाघमारे, प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. गौतम पाटील, डॉ. योगिता होके-पाटील, कुलसचिव डॉ. संजय कवडे आणि विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठ परिसरात ७ ऑक्टोबरपर्यंत विविध कला प्रकारांच्या स्पर्धा रंगणार आहेत.

यंदा दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन महोत्सव अत्यंत साधेपणाने आयोजित करण्यात आला आहे. जिल्हास्तरीय युवक महोत्सवात प्रत्येक कला प्रकारातून विजेते ठरलेल्या तीन संघांची केंद्रीय महोत्सवासाठी निवड करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि अन्य जिल्ह्यांमधून आलेल्या युवा कलावंतांच्या सादरीकरणामुळे विद्यापीठ परिसरात कलात्मक वातावरण निर्माण झाले.

विद्यापीठ नाट्यगृहात झालेल्या उद्घाटन सोहळ्यात जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे आयोजन करणाऱ्या महाविद्यालयांच्या प्राचार्य व सांस्कृतिक समन्वयकांचा गौरव करण्यात आला. राष्ट्रीय युवक महोत्सवात

उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कलावंतांचाही सत्कार

करण्यात आला. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळामार्फत वर्षभरात चार जिल्हास्तरीय महोत्सव, केंद्रीय युवक महोत्सव आणि जानेवारीत लोककला महोत्सव असे सहा महोत्सव आयोजित केले जाणार असल्याची माहिती डॉ. अंभुरे यांनी दिली.

'हारलेल्यांनाही सोबत घेऊन सिनेमा करतो' : नागराज मंजुळे

जीवनात यश-अपयशाला ठरावीक गणित नसते. अनेकदा आपण ज्यांना हरलेले समजतो, त्यांच्यातही मोठी क्षमता दडलेली असते. मी अशा माणसांना सोबत घेऊन काम केले आहे. पुढे जायचे असेल तर ध्येयाच्या दिशेने सातत्याने चालत राहणे गरजेचे आहे. शिक्षण केवळ शाळा-महाविद्यालयाच्या चौकटीत न ठेवता बाहेरच्या जगातूनही शिकले पाहिजे. कोणतीही पार्श्वभूमी नसतानाही आपण आपल्या कर्तृत्वावर दिग्दर्शक होऊ शकतो, असा संदेश नागराज मंजुळे यांनी युवा कलावंतांना दिला.

'वेदनेला चिमटीत पकडतो तोच खरा कलावंत' : कैलास वाघमारे

कलावंताने समाजातील आणि स्वतःच्या आयुष्यातील वेदना ओळखून त्या कलेतून व्यक्त केल्या पाहिजेत. पायात रुतलेला काटा चिमटीने काढल्यावर जशी वेदना कमी होते, त्याप्रमाणे वेदनेला कलेतून पकडणारा खरा कलावंत ठरतो, असे कैलास वाघमारे यांनी सांगितले. आयुष्यात मिळालेली संधी गमावू नका; योग्य वेळी मिळालेली संधी आपल्या प्रवासाला नवी दिशा देते, असेही त्यांनी नमूद केले.

'दुष्काळ रडायला नव्हे, लढायला शिकवतो' : कुलगुरू डॉ. फुलारी

मराठवाड्यातील माणूस अनेक दुष्काळातून तावून-सुलाखून निघाला आहे. संकटाच्या काळात खचून न जाता त्याचा सामना करण्याची ताकद दुष्काळ शिकवतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिभेचा प्रभावी आविष्कार सादर करावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी केले. विद्यार्थिनींचा युवक महोत्सवातील सहभाग वाढावा, यासाठी जिल्हास्तरीय आयोजनाला प्रोत्साहन देण्यात आले. साहित्य, कला आणि विज्ञानातील संशोधनाला चालना देण्यासाठी जिल्हावार आविष्कार संशोधन महोत्सवही घेतला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील तीन बड्या IAS अधिकाऱ्यांच्या बदल्या



मुंबई: राज्य सरकारने सोमवारी तीन सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली राज्यातील तीन IAS अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. काही वेळापूर्वीच मुख्यमंत्र्यांनी तीन वरिष्ठ IAS अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश काढले आहेत. संजय खंदारे, संजय यादव आणि वैष्णवी बी या तिन्ही अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली करण्याचे आदेश देण्यात आले आहे. संजय खंदारे यांची पर्यटन विभागाचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई येथून त्यांची अप्पर मुख्य सचिव (वन), वन विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर बदली करण्यात आली आहे.

संजय यादव यांची समग्र शिक्षा अभियान, मुंबईचे राज्य प्रकल्प संचालक पदावरून त्यांची सचिव (पर्यटन), पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर बदली करण्यात आली आहे. वैष्णवी बी. यांची अप्पर विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. संजय खंदारे हे 1996 च्या तुकडीतील भारतीय प्रशासकीय सेवेचे (आयएएस) अधिकारी आहेत. ते सध्या पर्यटन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत होते. त्यांच्या नव्या नियुक्तीनुसार ते आता वन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदाची जबाबदारी सांभाळतील. 2009 च्या तुकडीतील आयएएस अधिकारी संजय यादव हे समग्र शिक्षा अभियानाचे राज्य प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांची पर्यटन विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर, 2019 च्या तुकडीतील आयएएस अधिकारी वैष्णवी बी. यांची नागपूर विभागाच्या अतिरिक्त विभागीय आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

एमपीएससीचे आजी-माजी अध्यक्ष, सदस्यांच्या चौकशीसाठी समिती

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कामकाजाबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर आयोगाचे माजी व विद्यमान अध्यक्ष तसेच सदस्य यांच्याविरोधात संविधानाच्या कलम ३१७नुसार कार्यवाही करण्यासाठी समिती गठीत करण्याची शिफारस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांच्याकडे केली आहे. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून तिच्याकडून तीन महिन्यांत अहवाल मागवावा आणि त्यातील निष्कर्षांच्या आधारे पुढील कार्यवाही करावी, अशी विनंती करण्यात आली आहे. एमपीएससीच्या परीक्षा आणि आयोगाच्या कामकाजाबाबत विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात आंदोलन सुरू आहे.

पदवीधर निवडणुकीत प्रचाराला निर्बंध; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. तिची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ अन्वये विविध निर्बंध लागू केले आहेत.

शासकीय कार्यालये, विश्रामगृहे आदी परिसरात मिरवणुका काढणे, घोषणा देणे अथवा सभा घेण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच शासकीय, निमशासकीय आणि सार्वजनिक मालमत्तेचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष विद्रुपीकरण करता येणार नाही. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत इतर उमेदवारांचे नाव किंवा चिन्ह वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या नमुन्याबाहेरील कागदाचा वापर करणे तसेच निर्धारित आकारापेक्षा वेगळ्या नमुन्यात मतपत्रिकांची छपाई करण्यासही निर्बंध आहेत.

धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था तसेच सार्वजनिक ठिकाणांच्या जवळ तात्पुरती पक्ष कार्यालये सुरू करता येणार नाहीत. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची अधिकृत परवानगी नसताना वाहनांवर पक्षाचे झेंडे, भित्तीपत्रके किंवा प्रचार साहित्य लावण्यासही बंदी घालण्यात आली आहे.

दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात आणि कार्यालयीन दालनात उमेदवारासह अधिकृत चार व्यक्तींव्यतिरिक्त अन्य कोणालाही प्रवेश करता येणार नसल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

खडकपाटी - मालेगाव रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

जिंतूर - जालना महामार्गावरील मालेगाव-खडकपाटी दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे अज्ञात वाहनाने दुचाकी स्वारास धडक देऊन घटनास्थळावरून पोबारा केला या झालेल्या अपघातात जांब बुद्रुक येथील ३५ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. ज्ञानेश्वर दत्तात्रय बुधवंत असे मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे. ही घटना सोमवारी(दि. ५)दुपारी १. १५ च्या सुमारास घडली.

ज्ञानेश्वर बुधवंत हे दुचाकीवरून एकटेच प्रवास करीत होते. मालेगाव-खडकपाटी दरम्यान रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सुरू आहे. याच ठिकाणी एका अज्ञात वाहनाने दुचाकीस धडक दिल्याने बुंधवत हे दुचाकीसह रस्त्याच्या खाली जाऊन पडले. अपघातात त्यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली. अपघाताची माहिती मिळताच सचिन आडे यांनी मदतीसाठी धाव घेतली. सामाजिक कार्यकर्ते नागेश आकात व खासगी रुग्णवाहिका चालक संतोष जाधव यांनी घटनास्थळी पोहोचून गंभीर जखमी बुंधवत यांना तातडीने जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.



मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलसुम खाजा यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. अपघाताची माहिती मिळताच नातेवाइकांनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. युवकाच्या मृत्यूची वार्ता समजताच नातेवाइकांनी आक्रोश केला. बुंधवत यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. वृत्त लिहिपर्यंत पोलिस ठाण्यात घटनेची नोंद झाली नव्हती. घटनास्थळी चारठाणा पोलीस ठाण्याचे सपोनी बालाजी पुंड व कर्मचारीवर्गानी भेट देऊन माहिती घेतली.

छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून दिलीप घुगे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

पदवीधरांच्या शिक्षण, रोजगाराच्या प्रश्नांसाठी ठोस आवाज उठविण्याची ग्वाही

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील महाराष्ट्र विधान परिषद निवडणूक २०२६ चे अधिकृत उमेदवार दिलीप घुगे यांनी रविवारी (दि. ५) निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी क्रांती चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांनी अभिवादन केले.

यानंतर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह घुगे यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आपला उमेदवारी अर्ज सादर केला. यावेळी बोलताना, हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या



आशीर्वादाने आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने आपण ही निवडणूक लढवत असल्याचे घुगे यांनी सांगितले.

मराठवाड्यातील पदवीधरांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी पूर्ण ताकदीने निवडणुकीला सामोरे जाणार असून, शिक्षण, रोजगार तसेच पदवीधरांच्या विविध प्रश्नांवर ठोसपणे आवाज उठविण्याची भूमिका राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

उमेदवारी अर्ज दाखल करताना शिवसेना नेते अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे, आमदार राहुल पाटील, प्रवीण स्वामी, शिवसेना उपनेते सुभाष पाटील यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

दिव्यांग आरक्षणाचा अवमान आणि प्रशासकीय परीक्षा

जळगाव जिल्हा परिषदेत दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांच्या फेरतपासणीदरम्यान उघडकीस आलेली तफावत ही केवळ एका स्थानिक प्रशासकीय विभागातील अनियमितता नसून, संपूर्ण शासकीय सेवा भरती प्रक्रियेतील पारदर्शकतेला लागलेला मोठा तडा आहे. शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या २६३ कर्मचाऱ्यांची वैद्यकीय फेरतपासणी केली असता, तब्बल २११ कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्वाच्या टक्केवारीत मोठी फरक आढळून आला आहे. त्याहून धक्कादायक बाब म्हणजे ७२ कर्मचाऱ्यांचे दिव्यांगत्व १० टक्क्यांपेक्षाही कमी असल्याचे स्पष्ट झाले आहे. या निष्कर्षांमुळे तब्बल ९२ कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार निर्माण झाली असून, खऱ्या अर्थाने गरजू आणि पात्र दिव्यांग उमेदवारांच्या हक्कांवर डल्ला मारणाऱ्या या प्रवृत्तीचा कठोर शब्दांत निषेध करणे गरजेचे आहे. दिव्यांग आरक्षण हे समाजातील वंचित आणि विशेष गरज असलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संविधानाने दिलेले एक महत्त्वाचे संरक्षण कवच आहे. मात्र, बोगस किंवा वाढीव टक्केवारीची प्रमाणपत्रे मिळवून या आरक्षणाचा लाभ घेण्याची प्रवृत्ती वाढीस लागल्याचे या प्रकरणावरून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. जे कर्मचारी १० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असतानाही ४० टक्क्यांहून अधिकचे प्रमाणपत्र सादर करून सेवेत रुजू झाले, त्यांनी एका पात्र दिव्यांग उमेदवाराची संधी हिरावून घेतली आहे. या प्रकरणात केवळ कर्मचाऱ्यांवरच नव्हे, तर अशी संशयास्पद प्रमाणपत्रे देणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर आणि तपासणी मंडळावरही (Medical Boards) कठोर कायदेशीर व विभागीय कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या डॉक्टरांनी किंवा अधिकाऱ्यांनी पैशांच्या अथवा दबावाच्या बळावर ही प्रमाणपत्रे दिली, ते या गुन्ह्यात तितकेच भागीदार आहेत. प्रशासनाने आता केवळ कारणे दाखवा नोटीस किंवा तात्पुरत्या विलंबावर न थांबता, विभागीय चौकशीची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि कालमर्यादेत पूर्ण केली पाहिजे. जर फेरतपासणीत दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांचे गैरकृत्य सिद्ध झाले, तर त्यांना सेवेतून बडतर्फ करून त्यांच्याकडून आजवर घेतलेल्या वेतनाची वसुलीही केली गेली पाहिजे. त्याच वेळी, ज्या प्रामाणिक कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वैद्यकीय निकषांमधील बदलांमुळे फरक पडला असेल, त्यांच्यावर अन्याय होणार नाही याचीही दक्षता घेणे गरजेचे आहे. जळगाव जिल्हा परिषदेचे हे प्रकरण केवळ एका जिल्ह्यापुरते मर्यादित न ठेवता, राज्यातील सर्वच शासकीय व निमशासकीय विभागांमधील दिव्यांग प्रमाणपत्रांची राज्यव्यापी फेरतपासणी करण्याची हीच योग्य वेळ आहे, तरच खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळेल.

सेवा संकल्प अभियानांतर्गत पेडगाव येथे शेतकरी प्रशिक्षण; हळद, कापूस व पाणी व्यवस्थापनाबाबत वनामकृविच्या शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : - मा शासनाच्या निर्देशानुसार दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. नागरिकांना विविध शासकीय योजना, सेवा व माहिती प्रभावीपणे उपलब्ध करून देणे, कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करणे, नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे, सामाजिक सहभाग वाढविणे तसेच जलसंधारण, स्वच्छता आणि शाश्वत शेतीबाबत जनजागृती करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातर्फे हे अभियान माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त मौजे पेडगाव, ता. जि. परभणी येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्थानिक शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन हळद व कापूस पिकातील आधुनिक तंत्रज्ञान, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन तसेच पाणी व्यवस्थापनाबाबत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. गजानन गडदे यांनी हळद लागवडीपासून काढणीपर्यंत घ्यावयाच्या



काळजीबाबत मार्गदर्शन केले. हळदीची लागवड करताना विद्यापीठाच्या शिफारशीनुसार शास्त्रीय पद्धतीने योग्य आकाराचे बेड तयार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. योग्य बेडमुळे हळदीच्या कंदांना वाढ व पोषणासाठी पुरेशी जागा मिळते आणि उत्पादनवाढीस मदत होते, असे त्यांनी सांगितले.

हळद हे दीर्घ कालावधीचे पीक असल्याने त्यास अन्नद्रव्यांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. त्यामुळे विद्यापीठाच्या शिफारशीनुसार बेसल खत मात्रा देऊन त्यानंतर युरियाचा वापर योग्य प्रमाणात व विभागून करावा. तसेच दुसऱ्या व चौथ्या महिन्यात ००:५२:३४ व ००:००:५० यांसारख्या खतांचा शिफारशीनुसार वापर करावा. पिकाची गरज लक्षात घेऊन सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करणेही आवश्यक असल्याचे डॉ. गडदे यांनी स्पष्ट केले.

सद्यस्थितीत काही हळद उत्पादक शेतांमध्ये पाने करपण्याची लक्षणे दिसून येत असल्याने तज्ज्ञांनी शेतकऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पिकांची पाहणी केली. यावेळी जस्त, लोह (फेरस) व पालाश या अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आली. त्यामुळे पिकाची अवस्था व गरज लक्षात घेऊन अन्नद्रव्यांचे योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पाणी व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करताना डॉ. गडदे यांनी ठिबक व तुषार सिंचनाचे महत्त्व अधोरेखित केले. सध्याच्या आवर्षणसदृश परिस्थितीत उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. ठिबक सिंचनामुळे पाण्याची बचत होण्याबरोबरच खतांचा कार्यक्षम वापर करता येतो. विशेषतः हळद पिकामध्ये ठिबक सिंचनाद्वारे पिकाच्या गरजेनुसार पाणी व अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येते. योग्य पिके व परिस्थितीनुसार तुषार सिंचनाचाही वापर करून उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम उपयोग करता येतो, असे त्यांनी सांगितले.

कापूस पिकाबाबत मार्गदर्शन करताना घन लागवड पद्धतीचा अवलंब करून उत्पादनवाढीच्या दृष्टीने योग्य पीक नियोजन करावे, असे डॉ. गडदे यांनी सांगितले. घन लागवडीसाठी विद्यापीठाने शिफारस केलेल्या योग्य वाणांची निवड करून लागवड अंतर, अन्नद्रव्य व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन तसेच कीड व रोग व्यवस्थापनाचे योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी कीटकशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर पटाईत यांनी हळद पिकावरील कंदमाशीच्या व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. कंदमाशीची अळी जमिनीत व कंदामध्ये राहून नुकसान करत असल्याने सुरुवातीच्या अवस्थेत प्रादुर्भाव शेतकऱ्यांच्या लक्षात येत नाही. प्रादुर्भाव लक्षात येईपर्यंत मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असते. त्यामुळे नंतर केलेल्या उपाययोजनांचा अपेक्षित परिणाम मिळणे कठीण होते. यासाठी ऑगस्ट महिन्यापासूनच कंदमाशीच्या एकात्मिक व्यवस्थापनास सुरुवात करणे आवश्यक आहे, असे डॉ. पटाईत यांनी सांगितले.

कंदमाशीच्या व्यवस्थापनासाठी शिफारशीनुसार कीटकनाशकांची फवारणी व आळवणी वेळेवर करावी. शेतामध्ये उघडे पडलेले कंद मातीने झाकून घ्यावेत तसेच योग्य वेळी मातीची भर द्यावी. यामुळे कंदमाशीच्या प्रौढ माशीला कंदावर अंडी घालण्यास अडथळा निर्माण होऊन प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होते. तसेच शेतामध्ये ठिकठिकाणी एरंडीच्या बियांचे आंबवून तयार केलेले आमिष ठेवावे. या आमिषाकडे कंदमाशीचे प्रौढ आकर्षित होऊन त्यात पडल्यामुळे त्यांची संख्या कमी करण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

कंदमाशीबरोबरच हळदीवरील पानावरील ठिपके व करपा रोगांच्या व्यवस्थापनासाठी विद्यापीठाने शिफारस केलेल्या जैविक घटकांचा आळवणी व फवारणीद्वारे वापर करावा. आवश्यकता भासल्यास योग्य बुरशीनाशकासोबत स्टिकरचा वापर करून फवारणी करावी, जेणेकरून रोगाचा प्रादुर्भाव व प्रसार कमी करण्यास मदत होईल, असे डॉ. पटाईत यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमादरम्यान तज्ज्ञांनी श्री. चांदखान पठाण यांच्या हळद व कापूस प्रक्षेत्रास प्रत्यक्ष भेट देऊन पिकांची पाहणी केली आणि पीक परिस्थितीनुसार आवश्यक मार्गदर्शन केले. यावेळी शेख खदिर चांदखान पठाण, संतोष सुरवसे, शंतनु देशमुख, शेख अमीन, शेरखान व श्री. कुलदीप देशमुख यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते. कृषी विभागातर्फे सहाय्यक कृषी अधिकारी श्री. प्रसन्नजीत हनवते व उपकृषी अधिकारी श्री. अविनाश खिल्लारे उपस्थित होते. पेडगाव परिसरातील शेतकऱ्यांनी यावर्षी प्रथमच हळद पिकाची लागवड केली असून, या पिकाच्या तंत्रज्ञानाबाबत ते नवीन आहेत. त्यामुळे हळद लागवड, अन्नद्रव्य व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, कंदमाशी तसेच रोग व्यवस्थापनाबाबत मिळालेले मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी हळद लागवडीसंदर्भात विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. तसेच आगामी हंगामात शिफारशीत तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्याचा मानस व्यक्त केला.

आगामी रब्बी हंगामात उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर करून कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड करणे तसेच हळद व तुरीसारख्या दीर्घ कालावधीच्या पिकांसाठी पाणी व्यवस्थापन तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करण्याचे शेतकऱ्यांनी यावेळी सांगितले. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून कृषी विद्यापीठाचे शिफारशीत तंत्रज्ञान स्थानिक गरजांनुसार थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शेतकरी-केंद्रित मार्गदर्शन, कृषी तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार, जलसंधारण आणि शाश्वत शेतीला चालना देण्याच्या दृष्टीने पेडगाव येथील हा उपक्रम उपयुक्त ठरला.

पंधरवड्या एकादशी ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायणासाठी जास्त जास्त भाविक उपस्थित

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना मंडळ स्नेह शारदा नगर वसमत रोड परभणी वतीने प्रत्येक पंधरवड्या एकादशी पारायण सोहळ्याच्या निमित्ताने पंधरवड्या प्रत्येक एकादशीला म्हणजे महिन्यात दोन एकादशीला ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण वाचन होणार आहे 6 ऑक्टोंबर 2026 वार मंगळवार दुपारी चार ते सहा या वेळात श्री महालक्ष्मी मंदिर स्नेहनगर वसमत रोड परभणी येथे भव्य दिव्य ज्ञानेश्वरी पारायण विष्णुसहस्त्रनाम पारायण होणार आहे या पारायण व्यासपीठ नेतृत्व ह भ प बालाजी महाराज तुंगेनवार, रेणुकादास पाचपोर, सह पारायण वाचक सोपानराव डाळ, शिवाजीराव झाडे माणिकराव राऊत किशनराव पोपळाईत गुरुजी ,ज्ञानेश्वरी पारायण वाचक श्रीमती शीलाताई कदम ,श्रीमती वंदनाताई वाडकर मॅडम, श्रीमती मालतीताई देशमुख श्रीमती रेखाताई कदम त्यांच्यासह सर्व महिला पारायणाचे नेतृत्व करणार आहे तरी जास्त जास्त संख्येने ज्ञानेश्वरी पारायण वाचनासाठी उपस्थित राहावे अशी आव्हान ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना मंडळ स्नेहनगर -शारदा नगर वसमत रोड परभणी चे संकल्पक ह भ प बालाजी महाराज तुंगेनवार, ह भ प सोपानराव डाळ, रेणुकादास पाचपोर, माणिकराव राऊत, शिवाजीराव झाडे, शीलाताई कदम, वंदनाताई वाडकर रेखाताई कदम ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उपासना मंडळ महिला मंडळ भाविक भक्त सर्व पारायण करते च्या वतीने आव्हान करण्यात आले आहे ज्ञानेश्वर महाराज की जय अशी माहिती ज्ञानेश्वरी पारायण प्रचारक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे दिली

श्री घृष्णेश्वर मंदिरासमोरील भुयारी मार्गामुळे पर्यायी एस टी बस सेवेची ; आ प्रशांत बंब यांची मागणी

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



छत्रपती संभाजीनगर : वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिरासमोरील भुयारी रस्त्याचे काम सुरू झाल्याने हा मार्ग २९ सप्टेंबर २०२६ ते २९ मार्च २०२७ या सहा महिन्यांच्या कालावधीत वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. त्यामुळे या कालावधीत स्थानिक नागरिक, शालेय विद्यार्थी तसेच प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांनी पर्यायी मार्गावर एसटी बससेवा सुरू करण्याची मागणी केली आहे.

यासंदर्भात आमदार प्रशांत बंब यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय नियंत्रकांना पत्र दिले आहे. श्री घृष्णेश्वर मंदिरासमोरील भुयारी मार्गाचे काम सुरू असल्याने वाहतुकीचा मार्ग बदलणार असून, या काळात नागरिक आणि विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या दैनंदिन प्रवासाची गैरसोय होऊ नये, यासाठी पर्यायी वाहतूक व्यवस्था करण्याची मागणी पत्रातून करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर–लोणी बोडखा ही दुपारी १२ वाजता बंद असलेली बससेवा तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी बंब यांनी केली आहे. या बससेवेमुळे वेरूळ, श्री घृष्णेश्वर मंदिर परिसर आणि लगतच्या गावांतील नागरिकांना पर्यायी वाहतुकीची सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी छत्रपती संभाजीनगर–खुलताबाद–वेरूळ–गल्ले बोरगाव–कन्नड या मार्गावर पाच बसच्या शालेय फेऱ्या सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. श्री घृष्णेश्वर मंदिरासमोरील मार्ग बंद असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाण्या-येण्यासाठी अडचणी निर्माण होऊ शकतात, त्यामुळे नियमित बसफेऱ्यांची आवश्यकता असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, वडोद कान्होबा शाळेची फेरी बस सध्या फुलंब्री मार्गावरून सुरू आहे. ही बस खुलताबाद मार्गावरून सुरू ठेवण्यात यावी, अशी मागणीही आमदार बंब यांनी केली आहे. यामुळे वेरूळ, खुलताबादसह परिसरातील विद्यार्थ्यांना आणि प्रवाशांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

श्री घृष्णेश्वर मंदिरासमोरील भुयारी रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटी महामंडळाने पर्यायी मार्गांवर आवश्यक बससेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी आमदार प्रशांत बंब यांनी केली आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या विविध पिकांच्या वाणांना केंद्रीय स्तरावर मान्यता

कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांचे प्रभावी नेतृत्व व मार्गदर्शन

हिंदू प्रकाश वार्ता प्रातीनिधी

परभणी:-वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या संशोधनातून विकसित करण्यात आलेल्या विविध पिकांच्या वाणांना केंद्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण मान्यता मिळाली आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR) अंतर्गत कृषी पिकांच्या वाणांचे मानक, अधिसूचना व प्रसारणासाठी केंद्रीय उपसमितीच्या (Central Sub-Committee on Crop Standards, Notification and Release of Varieties – CSC on CSN&RV) ९५व्या बैठकीत विद्यापीठाशी संबंधित विविध वाणांच्या प्रसारणासंदर्भात शिफारसी व मंजुरी देण्यात आली.

यामध्ये विद्यापीठाच्या संशोधनातून विकसित तिळाचा टीएलटी ७ (TLT-7), चवळीचा 'परभणी पद्मा' (CPB 2201), ज्वारीचा 'परभणी सुपरडगडी' (SPV 2735), सोयाबीनचा एमएयुएस ८२४ (MAUS 824) तसेच कापसाचे एनएच २२०३७ बीजी २ (NH 22037 Bt BG-II) व एनएच २२०३८ बीजी २ (NH 22038 Bt BG-II) या वाणांचा समावेश आहे.

दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी नवी दिल्ली येथे भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक (पिक विज्ञान) डॉ. डी. के. यादव यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. विविध संस्थांचे संचालक, प्रकल्प समन्वयक आणि प्रमुख शास्त्रज्ञ यांच्या सादरीकरणानंतर संबंधित वाणांच्या कामगिरी व वैशिष्ट्यांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आला.

या संशोधन कार्यामागे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांचे प्रभावी नेतृत्व व मार्गदर्शन लाभले आहे. तसेच संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार, माजी संशोधन संचालक डॉ. खिजर बेग तसेच संबंधित पिकांवर कार्यरत शास्त्रज्ञांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

तिळाचा टीएलटी ७ (TLT-7) वाण

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या लातूर येथील तिळ संशोधनातून विकसित करण्यात आलेल्या टीएलटी ७ ('Trombay Latur Til-7 –TLT 7)' या तिळाच्या वाणाचा केंद्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त वाणांमध्ये समावेश करण्यात आला आहे. या वाणाची महाराष्ट्रासाठी शिफारस करण्यात आली आहे.

TLT-7 वाणाचा पक्वता कालावधी ९० ते ९५ दिवस, १०० बियांचे वजन ३.४ ते ४.० ग्रॅम, तर तेलाचे प्रमाण ४५ ते ४७ टक्के आहे. या वाणाची सरासरी बियाणे उत्पादकता ७ ते ८ क्विंटल प्रति हेक्टर असून, उन्हाळी हंगामासाठी हा वाण योग्य आहे.

तिळ - टीएलटी ७

चवळीचा 'परभणी पद्मा' वाण

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ आणि नवी दिल्ली येथील भा.कृ.अ.प.– राष्ट्रीय वनस्पती आनुवंशिक संसाधन ब्युरो (ICAR - NATIONAL BUREAU OF PLANT GENETIC RESOURCES, NEW DELHI) यांच्या सहकार्याने संशोधनातून विकसित करण्यात आलेल्या 'परभणी पद्मा' (CPB 2201) या चवळीच्या वाणाचा महाराष्ट्र राज्यासाठी समावेश करण्यात आला आहे. या वाणाची शिफारस डाळवर्गीय संशोधन केंद्र, बदनापूर, जि. जालना येथील संशोधनाच्या आधारे करण्यात आली आहे.

'परभणी पद्मा' या वाणाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे उच्च उत्पादनक्षम वाण – महाराष्ट्रात सरासरी उत्पादन ८७६ किलो प्रति हेक्टर, लवकर पक्व होणारा वाण – ८१ ते ९२ दिवसांत पक्वता; सरासरी पक्वता कालावधी ८६ दिवस, पिवळा मोझॅक (Yellow Mosaic) रोगास मध्यम प्रतिकारक्षम आणि १०० बियांचे वजन (Test Weight) – १२.७९ ग्रॅम अशी आहेत.

चवळी - 'परभणी पद्मा'

चवळी - 'परभणी पद्मा'

ज्वारीचा 'परभणी सुपरदगडी' वाण

महाराष्ट्रासाठी 'परभणी सुपरदगडी' (SPV 2735) या ज्वारीच्या वाणाचाही समावेश करण्यात आला आहे. हा वाण वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या संशोधनातून विकसित करण्यात आला आहे.

या वाणाचा पक्वता कालावधी ११५ ते ११८ दिवस असून, कोरडवाहू परिस्थितीत २२ ते २५ क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादन मिळते. तसेच ७० ते ७५ क्विंटल प्रति हेक्टर कडबा उत्पादन देण्याची क्षमता या वाणात आहे.

ज्वारी - 'परभणी सुपरदगडी'

सोयाबीनचा एमएयुएस ८२४ (MAUS 824) वाण

एमएयुएस ८२४ या सोयाबीन वाणाचाही केंद्रीय स्तरावरील यादीत समावेश करण्यात आला आहे. या वाणाची आसाम, मणिपूर, नागालँड, अरुणाचल प्रदेश आणि मेघालय या राज्यांसाठी शिफारस करण्यात आली आहे.

हा वाण भाकृअप–अखिल भारतीय समन्वित सोयाबीन संशोधन प्रकल्प (AICRP on Soybean), वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या संशोधनाशी संबंधित आहे. या वाणाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे MAUS 824 या सोयाबीन वाणाने ईशान्य पर्वतीय क्षेत्रात उत्कृष्टता नोंदविली आहे.

या वाणाची सरासरी धान्य उत्पादकता २३२९ किलो/हेक्टर असून, सर्वोत्तम तुलनात्मक वाणाच्या तुलनेत ती १०.४ टक्के अधिक आहे. तसेच तेल उत्पादन ४६५ किलो/हेक्टर असून, ते सर्वोत्तम तुलनात्मक वाणापेक्षा १२.६ टक्के अधिक आहे. या वाणाचे १०० बियांचे वजन १६.५ ग्रॅम असून, सर्वोत्तम तुलनात्मक वाणाच्या १०.७ ग्रॅमच्या तुलनेत ते ५४ टक्के अधिक आहे. त्यामुळे MAUS 824 हा मोठ्या आकाराच्या बियांचा वाण आहे. रोगप्रतिकारक्षमतेच्या दृष्टीने या वाणाने शेतपातळीवर अँथ्रॅक्नोज (करपा) आणि गंज रोगास मध्यम प्रतिकारक्षमता दर्शविली आहे.

उत्कृष्ट उत्पादनक्षमता, मोठ्या आकाराचे दाणे, अधिक तेल उत्पादन आणि रोगांना मध्यम प्रतिकारक्षमता या गुणधर्मांमुळे MAUS 824 या वाणाची ईशान्य पर्वतीय क्षेत्रासाठी लागवडीसाठी शिफारस करण्यासाठी ओळख (Identified for release) करण्यात आली आहे. या क्षेत्रात मणिपूर, आसाम आणि नागालँड या राज्यांचा समावेश आहे. एमएयुएस ८२४ — अधिक उत्पादन, मोठे दाणे आणि रोगप्रतिकारक्षमतेचा उत्कृष्ट संगम.

सोयाबीन - एमएयुएस ८२४

कापसाच्या दोन Bt वाणांना मान्यता

विद्यापीठाच्या नांदेड येथील भाकृअप–अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प (कापूस) – ICAR-AICRP on Cotton, Cotton Research Station यांच्या संशोधनातून विकसित करण्यात आलेल्या एनएच २२०३७ बीजी २ (NH 22037 Bt BG-II) व एनएच २२०३८ बीजी २ (NH 22038 Bt BG-II) या कापसाच्या वाणांचाही केंद्रीय स्तरावरील यादीत समावेश करण्यात आला आहे. या वाणांची महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेशासाठी नोंद करण्यात आली आहे.

NH 22037 BG-II वाणाचा पक्वता कालावधी सुमारे १६० ते १७० दिवस असून, त्याचे सरासरी उत्पादन १६ ते १८ क्विंटल प्रति हेक्टर आहे. या वाणामध्ये जिवाणूजन्य करपा व दहिया रोगास सहनशीलता असून, मोठ्या आकाराच्या बोंडांसह सघन लागवडीसाठी हा वाण योग्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

कापूस - एनएच २२०३७ बीटी

NH 22038 BG-II वाणाचा पक्वता कालावधीही १६० ते १७० दिवस असून, त्याचे सरासरी उत्पादन १८ ते २१ क्विंटल प्रति हेक्टर आहे. या वाणामध्ये रसशोषक किडी तसेच पानावरील ठिपके रोगास सहनशीलता असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

कापूस - एनएच २२०३८ बीटी

विद्यापीठाच्या संशोधनाची राष्ट्रीय स्तरावर दखल

विविध पिकांच्या वाणांना केंद्रीय स्तरावर मिळालेली ही मान्यता वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या पिक सुधारणा, वाण निर्मिती आणि संशोधन कार्याची राष्ट्रीय स्तरावर झालेली महत्त्वपूर्ण दखल आहे. विद्यापीठातील विविध संशोधन केंद्रे, अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प आणि शास्त्रज्ञांच्या सातत्यपूर्ण संशोधनातून विकसित होत असलेल्या वाण व तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पादनक्षम, अनुकूल आणि उपयुक्त वाण उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

विद्यापीठाच्या विविध पिकांवरील संशोधनाला केंद्रीय स्तरावर मिळालेल्या या मान्यतेमुळे विद्यापीठाच्या संशोधन–तंत्रज्ञान विकास–शेतकरी प्रसार या कार्याला आणखी चालना मिळणार असल्याचे विद्यापीठाच्या वतीने नमूद करण्यात आले.

युवकांची पदयात्रेतून हाक; 'नशामुक्त भारत, विकसित भारत'चा संदेश

बीबी का मकबरा ते विद्यापीठ गेटपर्यंत पदयात्रा; युवकांनी दिल्या जनजागृतीपर घोषणा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : व्यसनांपासून दूर राहून निरोगी आणि सक्षम समाज घडविण्याचा संदेश देत युवकांनी रविवारी शहरातून पदयात्रा काढली. 'माय भारत' आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित राज्यस्तरीय पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. बीबी का मकबरा ते विद्यापीठ गेटदरम्यान झालेल्या या पदयात्रेत युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत नशामुक्त भारताचा संदेश दिला.



जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात विविध शासकीय विभागांचे अधिकारी, पोलीस अधिकारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रतिनिधी, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले. प्रारंभी उपस्थितांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. यावेळी व्यसनमुक्तीवर आधारित पथनाट्यही सादर करण्यात आले.

सहायक पोलीस आयुक्त मझर सय्यद, सहायक पोलीस निरीक्षक सचिन जाधव, फौजदार उत्तरेश्वर मुंढे, सहायक फौजदार रोहनकार, जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे, नाशिकचे जिल्हा युवा अधिकारी अभिलाष म्हस्के, अहिल्यानगरचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजित संतोष, अंकृती फाउंडेशनच्या रूपा धोका, एनसीसीचे ब्रिजेश कुमार, पीईएस इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य पंडित फुलझेले तसेच एनसीसीचे राकेश कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती.

बीबी का मकबरा येथून सुरू झालेल्या पदयात्रेत विद्यार्थ्यांनी 'नशामुक्त भारत, विकसित भारत', 'व्यसनाला नकार, जीवनाला स्वीकार' अशा घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधले. विद्यापीठ गेट येथे पदयात्रेचा समारोप झाला. युवकांच्या सहभागातून व्यसनमुक्त आणि विकसित भारताचा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रकाश त्रिभुवन, विश्व युथ फाउंडेशनचे प्रतिनिधी, रोहन गोरमे, जय सरोने आणि दत्तू शिरसाठ यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन योगेश छबिलवाड यांनी केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

बुद्धिबळाच्या पटावर धनश्री ठोंबरेची दमदार बाजी



सिल्लोड : बुद्धिबळाच्या पटावर आपल्या बुद्धिमत्तेची आणि कौशल्याची प्रभावी छाप उमटवत सरस्वती विद्यालय, तळणी येथील विद्यार्थिनी कु. धनश्री गणेश ठोंबरे हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्यानंतर तिने मराठवाडा विभागीय स्तरावरील स्पर्धेत प्रवेश मिळवला. या संधीचे सोने करत धनश्रीने विभागीय स्पर्धेतही दमदार कामगिरी बजावत प्रथम क्रमांक पटकावला. धनश्रीने आपल्या अचूक चाली, शांत संयम आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात करत हे यश मिळवले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे सरस्वती विद्यालय, तळणीच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. धनश्रीच्या या उज्ज्वल यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य अशोक गरुड, संस्था उपाध्यक्ष श्री सतीश देशमुख आदी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन केले. तिच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि धनश्रीची मेहनत व जिद्द यांचा मोलाचा वाटा असल्याचे कौतुकाने नमूद करण्यात आले. या यशामुळे सरस्वती विद्यालयसह सिल्लोड तालुका आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

जिल्ह्यात नवरात्रोत्सव काळात कायदा-सुव्यवस्थेसाठी कडक उपाययोजना

11 ते 21 ऑक्टोबरदरम्यान मिरवणुका, सभा व पदयात्रांसाठी पूर्वपरवानगी बंधनकारक; कर्णकर्कश आवाजाची उपकरणे वापरावर प्रतिबंध

हिंदू प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: नवरात्रोत्सव, दुर्गादेवी आगमन-विसर्जन मिरवणुका, दसरा तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी परभणी पोलिस प्रशासनाने व्यापक प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत. महाराष्ट्र पोलीस कायदा तसेच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील तरतुदींनुसार दि. 11 ते 21 ऑक्टोबर 2026 दरम्यान पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी परभणी जिल्ह्यासाठी विविध आदेश जारी केले आहेत.

यंदा नवरात्रोत्सवाची सुरुवात ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेने होणार असून २० ऑक्टोबर रोजी दसरा तर २१ ऑक्टोबर रोजी दुर्गादेवी विसर्जन होणार आहे. या कालावधीत जिल्ह्यात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर धार्मिक कार्यक्रम, मिरवणुका, सभा व इतर सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्ष व विविध संघटनांकडून प्रसिद्धी किंवा वर्चस्वासाठी कार्यक्रम आयोजित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि सामाजिक सलोखा व शांतता कायम राहावी, यासाठी पोलिस प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत.

महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३६ अन्वये संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी किंवा त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या हद्दीत आवश्यक त्या सूचना व आदेश देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार रस्त्यावरील मिरवणुका, त्यातील नागरिकांकडून केली जाणारी वर्तणूक, मिरवणुकीचा मार्ग व वेळेबाबत पोलिसांकडून सूचना देण्यात आल्या आहेत.

सार्वजनिक ठिकाणी, धार्मिक स्थळांच्या परिसरात किंवा रस्त्यांवर गर्दी अथवा वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. विविध कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी किंवा त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. सामाजिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला बाधा निर्माण होणार नाही, याचे आयोजक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सहभागी नागरिकांनी पालन करणे आवश्यक राहणार आहे.

दरम्यान, नवरात्रोत्सव व दुर्गादेवी आगमन-विसर्जन मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ अन्वये स्वतंत्र प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. यामध्ये डॉल्बी साऊंडची टॉप, मिड, बेस अशा मल्टीस्पीकर सिस्टिम, प्लाझमा साऊंड सिस्टिम, प्रेशरमिड साऊंड सिस्टिम तसेच अशा साऊंड सिस्टिमसाठी बदल केलेली वाहने यांचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश दि.११ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री बारा वाजेपासून ते २१ ऑक्टोबर २०२६ रोजी 11.59 वाजेपर्यंत लागू राहणार आहे.

या कालावधीत पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ तसेच ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील तरतुदींचे उल्लंघन होऊ शकते. तसेच ध्वनी प्रदूषणाच्या प्रश्नावरून नागरिकांमध्ये किंवा विविध घटकांमध्ये वाद निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन ही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. नवरात्रोत्सव व दसरा काळात जिल्ह्यात शांतता, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. पोलिस प्रशासनाने दिलेल्या सूचना व आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी केले आहे.

महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३६ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३४ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. हे आदेश ११ ते २१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत दोन्ही दिवस धरून संपूर्ण परभणी जिल्ह्यात लागू राहणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

माजी सैनिकांसाठी परभणी जिल्ह्यात रोजगाराची संधी

इच्छुकांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा

हिंदू प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : जिल्ह्यातील माजी सैनिकांसाठी प्रतिष्ठित उद्योगसमूहामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. या उद्योगसमूहाच्या साखर कारखाना, शाळा, महाविद्यालय, कार एजन्सी तसेच अन्य विविध आस्थापनांमध्ये सुरक्षा व इतर पदांवर काम करण्यासाठी केवळ माजी सैनिकांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध झाली असल्याचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी अनुराधा ढालकरी यांनी सांगितले आहे.

या पदांसाठी पात्र माजी सैनिकांना चांगले वेतन तसेच नोकरीची हमी देण्यात येणार आहे. परभणी जिल्ह्यातील पात्र माजी सैनिकांना परभणी जिल्ह्यातच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या रोजगाराच्या संधीसाठी इच्छुक माजी सैनिकांचे वय ५५ वर्षांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. पात्र व इच्छुक माजी सैनिकांनी आपला सैन्य क्रमांक, सैन्यातील पद, संपूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक ही माहिती जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी येथे तातडीने पाठवावी. अधिक माहितीसाठी (संपर्क क्रमांक ९५१६३६०९४३) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भाग्यनगरात 11 ते 19 ऑक्टोबरदरम्यान संगीत महोत्सव

27 वर्षांची परंपरा; डॉ. श्रीरंग देशपांडे यांच्या पुढाकाराने शास्त्रीय संगीताची मेजवानी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : नवरात्रोत्सवानिमित्त ज्येष्ठ नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. श्रीरंग देशपांडे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात येणाऱ्या संगीत महोत्सवाचे यंदा २७ वे वर्ष आहे. भाग्यनगरातील दीपश्री, २५ येथे ११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान रंगणाऱ्या या महोत्सवात नवोदितांसह नामवंत शास्त्रीय गायक-वादकांची कला रसिकांना अनुभवता येणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता रामकृष्ण मिशन आश्रमाचे प्रमुख स्वामी विष्णुपादानंद यांच्या हस्ते होणार आहे. पहिल्या दिवशी स्वर प्रभुगावकर आणि पं. धनंजय जोशी यांचे गायन होईल.

महोत्सवात १२ ऑक्टोबर रोजी संमीहन जोशी यांचे तबलावादन व कल्याणी जोशी यांचे गायन, १३ रोजी संकल्प काळे व युगंधरा केचे यांची गायन मैफल, १४ रोजी ईश्वरी कुलकर्णी, अफजल हुसेन व सनतकुमार बडे यांचे गायन-वादन, १५ रोजी मनाली गर्गे व पं. भरत तेलंग यांचे गायन होणार आहे.

१६ रोजी चैत्रा अध्यापक व आदिनाथ पाटील यांचे गायन, १७ रोजी सुरभी परांजपे यांचे शास्त्रीय गायन व सुनील कुलकर्णी यांचे नाट्यगीत, १८ रोजी अथर्व केचे यांचे बासरीवादन तसेच पं. विश्वनाथ ओक व राजश्री ओक यांचे गायन होईल. १९ ऑक्टोबर रोजी डॉ. गुंजन शिरभाते यांचे व्हायोलिन वादन आणि पं. शुभदा पराडकर यांच्या शास्त्रीय गायनाने महोत्सवाची सांगता होणार आहे.

महोत्सवात दत्ता गोगटे, मंगेश कुलकर्णी, दिनेश डोळे, व्यंकटेश पंडित, रुद्र केचे व कृष्णा सव्वाशे तबल्याची साथसंगत करतील. जयंत नेरळकर, दिलीप दोडके, गजानन केचे व दिनेश डोळे संवादिनीवर साथ देतील. प्रशांत अपसिंगेकर, रूपाली पाटील, नागेश अंकुश व प्रवीण शर्मा सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळणार आहेत.

155 रुग्णांना जयपूर फूटची आशा; मोफत मोजमाप शिबिराला प्रतिसाद



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : रोटरी परिवार छ संभाजीनगर, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि प्रेरणा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय मोफत जयपूर फूट मोजमाप शिबिरात १५५ रुग्णांची नोंदणी करून त्यांचे मोजमाप करण्यात आले. गरजू रुग्णांना कृत्रिम पायासह आवश्यक सहाय्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे शिबिर घेण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, पीडीजी रो. सुहास वैद्य, प्रेरणा ट्रस्टचे सचिव अब्दुल हुसेन, प्रकल्प प्रमुख व डिस्ट्रिक्ट चेअर डीईआय रो. स्वाती स्मार्त, कॉप्स सेक्रेटरी अशोकजी तोशनीवाल, रो. साजिद पटेल, डॉ. शेख अफसर, महेजबीन शेख, जिया सर, डॉ. शकील, राज मोहम्मद तसेच आयआरसीतर्फे ख्वाजा अलीमुद्दीन यांच्या हस्ते झाले.

शिबिरात प्रेरणा ट्रस्टतर्फे पाच जणांना ब्लाइंड स्टिक, तर रत्ननिधी ट्रस्टतर्फे २० जणांना कुबड्या देण्यात आल्या. शिबिरासाठी आलेल्या सर्व रुग्णांच्या भोजनाची व्यवस्था आयआरसीतर्फे करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी प्रेरणा ट्रस्टचे प्रमुख कमांडर अनिल सावे, फारुख जमाल, डॉ. रविंद्र झंवर आणि डॉ. उज्वला झंवर यांनी शिबिराला भेट देऊन या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले. प्रेरणा ट्रस्ट भविष्यातही रोटरीसोबत अशा उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी राहील, असे त्यांनी सांगितले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रेसिडेंट रो. डॉ. अनिल जाधव, रो. डॉ. माधुरी जोशी, रो. सतीश जोशी, रो. रामेश्वर पवार, रो. मच्छिंद्र कुंभार, प्रतिभा जाधव, रो. डॉ. अलकनंदा सुपेकर, रो. डॉ. अनिता देशपांडे, रो. ब्रतबानी गोस्वामी, रो. ज्योती काथार, किरण जोशी, किरणकुमार धोत्रे, विजय जैस्वाल, सुरज डुमणे, रो. सागर खराडे आणि रो. अशोक देवरे यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनिल जाधव यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. माधुरी जोशी यांनी केले. रोट्रॅक्टचे विद्यार्थी, प्रेरणा ट्रस्टचे प्रेमराज पाटील, पाटील मॅडम तसेच ट्रस्टच्या सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

जिल्ह्यात दुष्काळातील विविध सवलती व उपाययोजना लागू -जिल्हाधिकारी

हिंदू प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या शासन निर्णयानुसार खरीप हंगाम २०२६ मध्ये ट्रीगर -1 (प्रथम कळ) लागू झालेल्या राज्यातील 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी परभणी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त नऊ तालुक्यांमध्ये शासन निर्णयानुसार विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच पशुधनासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन तसेच शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्यात आली आहे. याशिवाय कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सवलत देण्यात येणार आहे. साडेसात अश्वशक्तीपर्यंत क्षमतेच्या कृषी पंपांचे वीजबिल यापूर्वीच माफ करण्यात आले असून, त्यावरील क्षमतेच्या कृषी पंपांनाही शासन निर्णयानुसार सवलत लागू राहणार आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दिलासा देताना परीक्षा शुल्कात माफी देण्यात आली आहे. रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांच्या निकषांमध्ये आवश्यक ती शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच जलसंधारणाची कामे सुरू करण्यावरही भर देण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीपंपांची वीज जोडणी खंडित न करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी, शेतमजूर आदींना अन्नधान्याची टंचाई भासू नये, यासाठी आवश्यक व्यवस्था उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच जनावरांसाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देणे, पिण्याचे पाणी व पशुधनासाठी पाण्याचे नियोजन करणे याबाबतही संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

दुष्काळग्रस्त नऊ तालुक्यांमध्ये शासनाने लागू केलेल्या सर्व सवलती व उपाययोजनांचा लाभ संबंधित पात्र खातेदारांना मिळेल, यासाठी सर्व विभागप्रमुखांनी आवश्यक कार्यवाही करावी. तसेच करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले आहेत.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात क्वांटम क्लबचे उद्घाटन

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व संशोधनाची गोडी निर्माण करण्याचा उपक्रम - डॉ.रामेश्वर मगर

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.५ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने क्वांटम क्लबचे उद्घाटन उत्साहात करण्यात आले. अजिंठा शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाश काळे यांच्या हस्ते क्लबचे उद्घाटन झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे होते.

यावेळी प्रमुख संसाधन व्यक्ती म्हणून रसायनशास्त्र विभागप्रमुख तथा पदव्युत्तर समन्वयक डॉ.रामेश्वर मगर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी क्वांटम भौतिकशास्त्राचे महत्त्व,आधुनिक संशोधनातील संधी तसेच भविष्यातील विविध क्षेत्रांमध्ये क्वांटम तंत्रज्ञानाची वाढती उपयुक्तता याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आधुनिक विज्ञानातील बदलत्या प्रवाहांचा अभ्यास करून संशोधनाच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाची प्रस्तावना भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनोद बारोटे यांनी केली. क्वांटम क्लब स्थापन करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन,संशोधनवृत्ती, जिज्ञासा आणि आधुनिक भौतिकशास्त्राविषयी रुची निर्माण करण्यासाठी क्वांटम क्लब महत्त्वाची भूमिका बजावेल.या माध्यमातून विद्यार्थ्यांना क्वांटम विज्ञानातील नवनवीन संकल्पना व तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.



अध्यक्षीय मनोगतात डॉ.रावसाहेब बारोटे यांनी विद्यार्थ्यांनी क्वांटम विज्ञानातील नव्या संकल्पना आत्मसात करून संशोधन क्षेत्रात पुढे यावे,असे आवाहन केले.भविष्यात क्वांटम तंत्रज्ञानाला विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होणार असून विद्यार्थ्यांनी त्यासाठी आतापासूनच स्वतःला अद्ययावत ठेवावे,असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शंतनू चव्हाण यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्रा.अश्विनी काळे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.अश्विनी पाटील व सुनील साळुंखे यांनी परिश्रम घेतले.

यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक,विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्वांटम क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक भौतिकशास्त्र,संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नवी दिशा मिळणार असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले.

दुष्काळात शेतकऱ्यांना बँकांचा आधार द्या; सक्तीची वसुली टाळा : जिल्हाधिकारी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : दुष्काळी परिस्थितीत अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी बँकांनी संवेदनशील भूमिका घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी जिल्ह्यातील सर्व बँकांना दिले आहेत. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना आगामी हंगामासाठी तातडीने पीक कर्ज उपलब्ध करून देण्याबरोबरच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांकडून अनावश्यक सक्तीची वसुली करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज देण्यास प्राधान्य द्यावे. ज्या बँक शाखेत कर्जमाफीची रक्कम जमा झाली आहे, त्याच शाखेमार्फत संबंधित शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

दुष्काळग्रस्त अथवा दुष्काळाने बाधित क्षेत्रातील पात्र शेतकऱ्यांविरुद्ध केवळ कर्ज थकीत असल्याच्या कारणावरून अनावश्यक सक्तीची वसुली करू नये. तसेच शेतीविषयक कर्ज प्रस्ताव शाखास्तरावर विनाकारण प्रलंबित ठेवू नयेत. पात्र पीक कर्ज प्रस्तावांचा नियमित आढावा घेऊन त्यांचा तातडीने निपटारा करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

दरम्यान, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाने लागू केलेल्या कर्जसवलती, कर्जाचे पुनर्गठन किंवा पुनर्निर्धारण तसेच अन्य उपाययोजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांना वेळेत मिळवून द्यावा. शासनाच्या निर्देशांची काटेकोर आणि तातडीने अंमलबजावणी करून संकटाच्या काळात शेतकऱ्यांना बँकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी गौडा यांनी केले आहे.

दुष्काळात अळंबी उत्पादन ठरणार उत्पन्नाचा आधार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना पर्यायी उत्पन्नाचा स्रोत मिळावा, तसेच महिलांना घरच्या घरी व्यवसायाची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी पैठण येथील कृषी विज्ञान केंद्रात अळंबी उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षणाला सुरुवात झाली. दि. ७ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या प्रशिक्षणात जिल्ह्यातील ६० महिला व पुरुष प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

संचालक, फलोत्पादन कार्यालय, कृषी आयुक्तालय पुणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, कृषी विज्ञान केंद्र छत्रपती संभाजीनगर आणि महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटनप्रसंगी विभागीय कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधक डॉ. सूर्यकांत पवार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, कृषी विज्ञान केंद्राच्या प्रमुख डॉ. दीप्ती पाडगावकर, एमसीडीसी पुणेचे विभाग प्रमुख दिगंबर साबळे, विभागीय व्यवस्थापक आशिष शिंदे आदी उपस्थित होते.

पैठणमध्ये अळंबी उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षणाला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

अळंबी उत्पादन दुष्काळात शेतकऱ्यांसाठी आधार ठरू शकते, असे डॉ. सूर्यकांत पवार यांनी सांगितले. कमी जागेत आणि तुलनेने सुलभ पद्धतीने करता येणारा हा व्यवसाय महिलांसाठीही उपयुक्त असल्याने त्याचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, कृषी विभागाच्या विविध अनुदान योजना तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती दीपक गवळी यांनी दिली. अळंबीचे मूल्यवर्धन केल्यास या व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळू शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. प्रशिक्षण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन दिगंबर साबळे यांनी केले.

यंदाचा दुष्काळ गंभीर; शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या; पंचनाम्यांना गती देण्याचे आ. अब्दुल सत्तार यांचे आवाहन

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीर

सिल्लोड-सोयगाव तालुक्यातील यंदाची दुष्काळी परिस्थिती १९७२च्या दुष्काळापेक्षाही गंभीर आहे. या संकटाच्या काळात पक्षभेद बाजूला ठेवून शेतकऱ्यांना केंद्रस्थानी मानत त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे. शासनाकडून सुरू असलेल्या पंचनाम्यांच्या कामाला गती देऊन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन आमदार अब्दुल सत्तार यांनी केले.

दुष्काळी परिस्थिती आणि पंचनाम्यांच्या कामाचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी आ. सत्तार यांनी डोंगरगाव, शिवना, अजिंठा, उंडणगाव, घाटनांद्रा, अंधारी, अंभई, भराडी, कायगाव यांसह विविध गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.



दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, सणासुदीच्या काळात त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यामुळे शासनाची आर्थिक मदत आणि पीक विम्याची रक्कम दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा व्हावी, यासाठी आवश्यक कार्यवाहीला गती देण्याची मागणी आ. सत्तार यांनी सांगितले.

पंचनाम्यांची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांना विलंब न करता मदत मिळावी, यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विशेष मतदार नोंदणी शिबिर

यावेळी आ. सत्तार यांनी निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ अंतर्गत ३ ते १२ ऑक्टोबरदरम्यान सुरू असलेल्या विशेष मतदार नोंदणी शिबिराची माहिती दिली. १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांनी नोंदणी करून घ्यावी. तसेच नागरिकांनी मतदार यादीतील आपल्या नावाची शहानिशा करून आवश्यक दुरुस्ती करून घ्यावी. एकही पात्र नागरिक मतदार यादीतून वंचित राहू नये, यासाठी नागरिकांनी शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

देण्याची मागणी केली असल्याचे आ. सत्तार यांनी सांगितले.

याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव तायडे, निवृत्त सहकार उपायुक्त व जि. प. सदस्य देविदास पालोदकर, अब्दुल आमेर, आ. सत्तार, जिल्हा बँकेचे संचालक अर्जुन गाढे, राजूबाबा काळे, पंचायत समिती सदस्य निजाम पठाण, शेख सलीम, अंबादास शिंदे, समी चाउस, कृषी बाजार समितीचे सभापती सतीश ताठे, संचालक दामूअण्णा गव्हाणे, विश्वास दामाडे, राजाराम पाडळे, संदीप राऊत, कौतिकराव मोरे, मुरलीधर काळे, नगरसेवक सिद्धेश्वर आहेर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

आमदार अब्दुल सत्तार यांनी विविध गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सोहम वायाळ यांचा राज्य कामगार विमा रुग्णालयातील सुविधांचा आढावा

महिला, ज्येष्ठ व दिव्यांगांसाठी स्वतंत्र सेवा खिडकी; दंत विभागात आणखी एक खुर्ची देणार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालयातील आरोग्य सुविधांचा संचालक सोहम वायाळ यांनी आढावा घेतला. रुग्णांना वेळेत, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळावी, यासाठी आवश्यक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना त्यांनी रुग्णालय प्रशासनाला दिल्या.

वायाळ यांनी रुग्णालयातील ५ खाटांच्या डायलेसिस युनिटची पाहणी करून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी प्रत्यक्ष संवाद साधला. डायलेसिस सेवांबाबत त्यांचे अनुभव जाणून घेतले असता रुग्ण व नातेवाईकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक मते आणि निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एफ. एल. पठाण उपस्थित होते.

त्यानंतर त्यांनी दंत विभागाची पाहणी करून दंत बाह्यरुग्ण विभागातील रुग्णसंख्येचा आढावा घेतला. दंत ओपीडीला मिळणारा प्रतिसाद समाधानकारक असल्याचे नमूद करत रुग्णांच्या सुविधेसाठी लवकरच आणखी एक दंतचिकित्सा



खुर्ची उपलब्ध करून देण्यात येईल, असे वायाळ यांनी सांगितले.

दरम्यान, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग रुग्णांसाठी स्वतंत्र सेवा खिडकी सुरू करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. रुग्णांना विविध सेवा मिळविताना अडचणी येऊ नयेत आणि उपचार प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी, यावर त्यांनी विशेष भर दिला.

मराठवाड्याच्या प्रश्नांसाठी विधानपरिषदेत निर्णायक लढा देणार : सुशील घोटे

पदवीधर, शिक्षक, प्राध्यापकांसह बेरोजगारांच्या प्रश्नांना प्रभावी आवाज देण्याचा निर्धार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची निवडणूक ही केवळ एका व्यक्तीला विधानपरिषदेत पाठविण्याची निवडणूक नसून, पदवीधर युवक, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, बेरोजगार आणि संपूर्ण मराठवाड्याच्या प्रश्नांना सभागृहात प्रभावी आवाज देण्याची निवडणूक आहे, अशी भूमिका मराठवाडा शिक्षक संघाचे उमेदवार सुशील सुरेशराव घोटे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत मांडली.

मराठवाड्यातील विकासाचा अनुशेष, वाढती बेरोजगारी, उद्योगांची कमतरता, उच्च शिक्षणातील अडचणी, शिक्षक-प्राध्यापकांच्या प्रलंबित मागण्या, विद्यार्थ्यांचे शुल्क व शिष्यवृत्तीचे प्रश्न तसेच स्पर्धा परीक्षांसाठी अपुऱ्या सुविधा यामुळे तरुणांसमोर मोठी आव्हाने उभी आहेत. या प्रश्नांवर केवळ आश्वासने न देता शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून निर्णय घेण्यास भाग पाडू, असे घोटे यांनी सांगितले.

मराठवाड्यात रोजगारनिर्मितीसाठी नवीन उद्योग आणणे, रिक्त शासकीय व निमशासकीय पदांची नियमित भरती, प्रत्येक जिल्ह्यात स्पर्धा परीक्षा व कौशल्य प्रशिक्षणाच्या सुविधा, युवकांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य आणि उच्च शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, हे आपल्या प्राधान्यक्रमात राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षक व प्राध्यापकांच्या सेवा विषयक प्रलंबित प्रश्नांचा पाठपुरावा, शिक्षक भरती नियमित करणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना न्याय देणे आणि उच्च शिक्षणातील रिक्त पदे भरण्यासाठी शासनावर दबाव निर्माण करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या आठही जिल्ह्यांतील प्रश्नांना एकत्रित व्यासपीठ मिळवून देण्यासाठी काम करणार असल्याचे घोटे म्हणाले. "पदवीधरांचा प्रश्न म्हणजे केवळ नोकरीचा प्रश्न नसून शिक्षण, रोजगार, उद्योग, कौशल्य आणि मराठवाड्याच्या भवितव्याचा प्रश्न आहे. प्रश्न सुटेपर्यंत विधानपरिषदेत संघर्ष करणार," असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

चावा घेतल्यास घाबरू नका, जखम तातडीने धुवा' : डॉ. शिवाजी सुक्रे

रेबीज प्रतिबंधासाठी वेळेत उपचार घेण्याचे आवाहन; घाटीत वर्षाला सुमारे 50 हजार जणांवर उपचार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : प्राण्याने चावा घेतल्यास घाबरून न जाता जखम तातडीने साबण व वाहत्या पाण्याने किमान १५ मिनिटे धुवावी आणि विलंब न करता वैद्यकीय उपचार घ्यावेत, असे आवाहन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी केले. योग्य वेळी प्रतिबंधात्मक उपचार घेतल्यास रेबीज पूर्णपणे टाळता येतो, त्यामुळे नागरिकांनी प्राण्यांच्या चाव्याकडे दुर्लक्ष करू नये, असेही त्यांनी सांगितले.

जागतिक रेबीज दिनानिमित्त घाटीच्या जन-औषध वैद्यकशास्त्र विभागाच्या वतीने बाह्यरुग्ण विभागाच्या परिसरात जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. विभागप्रमुख डॉ. स्मिता अणदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. रुपाली बाविसकर यांनी सूत्रसंचालन केले.

रेबीज हा संक्रमित प्राण्याच्या चाव्यामुळे किंवा लाळेच्या संपर्कातून होणारा विषाणूजन्य आजार आहे. लक्षणे सुरू झाल्यानंतर हा आजार जवळपास १०० टक्के प्राणघातक ठरतो; मात्र चावा घेतल्यानंतर तातडीने योग्य उपचार घेतल्यास रेबीजपासून बचाव करता येतो. जखमेवर मिरची, चुना, माती, तेल किंवा अन्य पदार्थ लावू नयेत. जखम स्वच्छ धुतल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने रेबीज प्रतिबंधक लसीकरण आणि आवश्यक असल्यास इम्युनोग्लोब्युलिन घेणे गरजेचे आहे.

पथनाट्यातून जनजागृती

कार्यक्रमात जन-औषध वैद्यकशास्त्र विभागातील निवासी डॉक्टर व इंटर्न डॉक्टरांनी रेबीज जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. प्राण्यांच्या चाव्यानंतर करावयाची प्रथमोपचार प्रक्रिया, लसीकरणाचे महत्त्व आणि रेबीजबाबतच्या गैरसमजुती यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. भित्तीपत्रक स्पर्धेतूनही रेबीजची कारणे, संसर्गाचा मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय आणि तातडीच्या उपचारांची माहिती देण्यात आली. नर्सिंग विद्यार्थ्यांनीही उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

दरवर्षी ५० हजार जणांवर उपचार

घाटीतील अँटी रेबीज व्हॅक्सीन (एआरव्ही) बाह्यरुग्ण विभागात दररोज सरासरी १०० ते १५० रुग्ण येतात. दरमहा सुमारे ४ हजार ५०० ते ५ हजार, तर वर्षाला सुमारे ५० हजार रुग्णांना प्राण्यांच्या चाव्यानंतर मोफत उपचार, रेबीज प्रतिबंधक लसीकरण आणि आवश्यकतेनुसार इम्युनोग्लोब्युलिन उपचार दिले जातात.कार्यक्रमाच्या शेवटी विविध उपक्रमांतील विजेत्यांना डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यावेळी डॉ. सुरेश हरबडे, डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. विनोद मुंदडा, डॉ. शैलजा राव, डॉ. शिल्पा आसेगावकर, डॉ. राधेय खेत्रे, डॉ. शुभदा पवार, डॉ. गणेश लोखंडे, डॉ. महावीर नाकेल, डॉ. शैलेश पालवे, डॉ. श्वेता देशमुख, डॉ. स्वाती भिसे यांच्यासह निवासी डॉक्टर, इंटर्न डॉक्टर, नर्सिंग विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

पाथरी उपविभागातील सार्वजनिक जलसाठे 31 ऑक्टोबरपर्यंत संरक्षित : उपविभागीय अधिकारी

जलसाठ्यांमधून अनधिकृत पाणी उपशास मनाई

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी : पाथरी उपविभागात कमी पावसामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश्य परिस्थिती आणि भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता सार्वजनिक जलसाठ्यांमधील उपलब्ध पाणी पिण्यासाठी सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने 31 ऑक्टोबरपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश उपविभागीय दंडाधिकारी संगीता चव्हाण यांनी जारी केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 मधील कलम 163 अन्वये जारी करण्यात आलेला आदेश पाथरी उपविभागातील पाथरी, मानवत व सोनपेठ तालुक्यांतील सर्व सार्वजनिक जलसाठ्यांच्या ठिकाणी दि.31 ऑक्टोबर 2026 पर्यंत 24 तास लागू राहणार आहे.

या कालावधीत सार्वजनिक जलसाठ्यांमध्ये अनधिकृत हस्तक्षेप करणे, अनधिकृतपणे पाणी उपसा करणे, जलसाठ्याच्या बांधकामास नुकसान पोहोचविणे तसेच पाणी व्यवस्थापन व देखभालीचे काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या शासकीय कर्तव्यामध्ये अडथळा निर्माण करणे किंवा त्यांना धमकावणे यास मनाई करण्यात आली आहे.

पाणीटंचाईच्या संभाव्य परिस्थितीत उपलब्ध पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याचे नियोजनबद्ध वितरण सुनिश्चित करणे आणि पाणी व्यवस्थापनाच्या कामात अडथळे येऊ नयेत, हा या आदेशाचा उद्देश आहे. आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित पोलीस विभागाने आवश्यक प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी संगीता चव्हाण यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

हा आदेश सर्वसामान्य नागरिकांना लागू असल्याने पाटबंधारे विभाग, तहसीलदार व पोलीस विभागाने दवंडी, ध्वनिक्षेपक तसेच उपलब्ध इतर प्रसिद्धी माध्यमांद्वारे जनजागृती करावी. तसेच संबंधित पोलीस अधिकारी, तालुका दंडाधिकारी, नगर परिषद कार्यालये, पोलीस ठाणे आणि पाटबंधारे विभागाच्या कार्यालयांच्या नोटीस बोर्डवर आदेशाची प्रसिद्धी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

हर्सल पोलीस ठाण्यासमोर 3 वाहनांचा विचित्र अपघात

इनोव्हाच्या अचानक ब्रेकमुळे अर्टीगाला बोलेरो पिकअपची धडक

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जळगाव रोडवरील हर्सल पोलीस ठाण्यासमोर असलेल्या गतिरोधकाजवळ एका इनोव्हा कारचालकाने अचानक ब्रेक दाबल्यामुळे तीन वाहनांच्या मालिकेत विचित्र अपघात घडला. रविवारी (४ ऑक्टोबर) रात्री १०. १५ च्या सुमारास घडलेल्या या अपघातात मारुती सुझुकी अर्टीगा कारच्या पाठीमागील भागाचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथील गौरव विजय थोरवत (वय २७) हे त्यांचे सहकारी सागर जसवंत वखारिया (वय ३७, रा. पुणे) यांच्यासह हिंगणघाट येथून अर्टीगा कारने (क्र. एमएच १२) जळगाव रोडमार्गे छत्रपती संभाजीनगरहून पुण्याकडे जात होते. ते हर्सल पोलीस ठाण्यासमोर आले असता, त्यांच्या पुढे चालणाऱ्या इनोव्हा कारच्या चालकाने अचानक ब्रेक दाबला. यामुळे थोरवत यांनाही आपली कार अचानक थांबवावी लागली.

त्याच वेळी पाठीमागून भरधाव वेगात येणाऱ्या बोलेरो पिकअपच्या (क्र. एमएच २० जीसी ८६☒) चालकाला परिस्थितीचा अंदाज आला नाही आणि त्याने अर्टीगा कारला मागून जोरदार धडक दिली. या विचित्र धडकेमुळे अर्टीगा कारच्या मागचा हिस्सा पूर्णपणे चेंदामेदा झाला असून मोठे नुकसान झाले आहे. मात्र, या भीषण अपघातात सुदैवाने दोन्ही प्रवाशांना कोणतीही दुखापत झालेली नाही. ज्या इनोव्हा कारमुळे हा अपघात घडला, त्या इनोव्हा कारचा क्रमांक अद्याप समोर आलेला नाही.

या प्रकरणी कारचालक गौरव थोरवत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हर्सल पोलीस ठाण्यात बोलेरो पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर ढाकणे करत आहेत.

रायगड जिल्ह्यात RMBKS- अंतर्गत प्रोटानच्या 13 सदस्यीय कार्यकारिणीची स्थापना

शिक्षक-प्राध्यापकांच्या हक्कांसाठी नवी ताकद : रायगडात मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या ट्रेड युनियनचा विस्तार

अलिबाग / रायगड : राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ (RMBKS) या ट्रेड युनियनच्या एज्युकेशन सर्व्हिसेस विंग अंतर्गत प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी विंग (PROTAN) ची रायगड जिल्हा कार्यकारिणी अधिकृतपणे स्थापन करण्यात आली आहे. याबाबतचे तीन पानी अधिकृत निवेदन संघटनेच्या महाराष्ट्र राज्य युनिटचे अध्यक्ष डॉ. संजय धाबर्डे यांच्या स्वाक्षरीने शिक्षण उपसंचालक (मुंबई विभाग), मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. रायगड, जिल्हा परिषद रायगड, विभागीय उपयुक्त समाजकल्याण विभाग मुंबई, जिल्हाधिकारी रायगड आणि समाजकल्याण



अधिकारी रायगड यांना सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, RMBKS ही नोंदणीकृत ट्रेड युनियन असून भारतीय ट्रेड युनियन अधिनियम, 1926 अंतर्गत क्रमांक ALC/17/10744 दिनांक 30/05/2013 अन्वये तिची नोंदणी झाली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली भारत देशात सरकारी व खाजगी उपक्रमांत संघटित व असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगार व कर्मचाऱ्यांचे हक्क व अधिकाराकरिता ही संघटना कार्यरत आहे.

रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांतील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी ही जिल्हा कार्यकारिणी काम करणार आहे. जाहीर करण्यात आलेल्या 13 सदस्यीय कार्यकारिणीत अध्यक्षपदी शैलेश गणपत लोखंडे, कार्यकारी अध्यक्ष पदी श्याम पांडुरंग वाघमारे, उपाध्यक्षपदी उमा अजित तारु आणि पोपट अर्जुन कदम, महासचिवपदी विजयकुमार अनिल भिंगोलीकर, सचिवपदी संतोष सदू चव्हाण आणि रवींद्र नामदेव मोरे, कोषाध्यक्षपदी सूर्यकांत केशव कासे, तर कार्यकारी सदस्य पदी मारुती सहदेव आगरे, अविनाश मिट्टू गायकवाड, प्रवीणकुमार बसवराज नागोरे, सुप्रिया सचिन शिर्के, गजानन शिवाजी माने यांचा कार्यकारी सदस्यांचा समावेश आहे.

सदर कार्यकारिणीची माहिती संबंधित प्रशासकीय कार्यालयांनी अधिकृतरित्या संबंधित प्रशासनासोबत अंमलात आणावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती मंत्रालय, शिक्षण संचालनालय पुणे, समाजकल्याण आयुक्तालय पुणे यांच्यासह संघटनेच्या राष्ट्रीय व राज्य पदाधिकाऱ्यांना माहितीस्तव पाठवण्यात आल्या आहेत.

जिंतूरकरांना गहू की गुरांचे खाद्य? स्वस्त धान्य दुकानातून किडलेल्या धान्याचे वाटप

नागरिकांचा तीव्र संताप; अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

जिंतूर: गोरगरिबांच्या पोटाला चिमटा काढून स्वतःच्या पोळ्या भाजणाऱ्या लाचार आणि निर्दयी प्रशासनाचा खरा आणि विदारक चेहरा अखेर जिंतूर शहरात उघडा पडला आहे! शासनाकडून गरिबांना रास्त भावात चांगल्या दर्जाचे धान्य देण्याच्या वलग्ना रोज केल्या जातात. पण प्रत्यक्षात प्रशासकीय पातळीवर सामान्य नागरिकांच्या जिवाशी कसला जीवघेणा खेळ सुरू आहे, याचा संतापजनक प्रकार जिंतूर शहरात चव्हाट्यावर आला आहे. शहरातील स्वस्त धान्य दुकानांमधून सप्टेंबर महिन्यात थेट जनावरांनाही खाण्यायोग्य नसलेला, किडलेला आणि निकृष्ट दर्जाचा गहू लाभार्थ्यांच्या माथी मारला जात असल्याने जिंतूरकरांचा संताप अनावर झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिंतूर शहरातील स्वस्त धान्य दुकानांतून लाभार्थ्यांना धान्याचे वाटप सुरू होते. मात्र, गव्हाचा तो अतिशय घाणेरडा आणि दुर्गंधीयुक्त दर्जा पाहून संतप्त लाभार्थ्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. नागरिकांनी संबंधित दुकानदाराला जाब विचारत हे 'नावडते धान्य' घेण्यास थेट नकार दिला. या प्रकाराचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्याच्या वेगाने व्हायरल होताच संपूर्ण परभणी जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. इतकेच नव्हे तर, गेल्या अनेक महिन्यांपासून किडलेला आणि चुरा झालेला तांदूळही गोरगरिबांच्या घशात कोंबला जात असल्याचे आता समोर आले आहे.

शासन एकीकडे गोरगरिबांच्या कल्याणाचा आणि स्वच्छ धान्याचा डांगोरा पिटत डिंगा मारत आहे,



तर दुसरीकडे प्रत्यक्ष दुकानांमध्ये माणसांना खाण्यायोग्य नसलेले कचरासदृश धान्य वाटून नागरिकांच्या आरोग्याशी उघड-उघड खेळ सुरू आहे. या बेजबाबदार आणि भ्रष्ट कारभाराविरोधात जिल्हा पुरवठा अधिकारी आणि स्थानिक पुरवठा विभागाने तातडीने कुंभकर्णी झोपेतून जागे व्हावे, असा इशारा देण्यात येत आहे.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत आक्रमक!

या लाजीरवाण्या प्रकाराची गंभीर दखल घेत 'अखिल भारतीय ग्राहक पंचायत'च्या वतीने जिंतूर तहसीलदारांमार्फत थेट परभणीच्या जिल्हाधिकाऱ्यांना ५ ऑक्टोबर रोजी निवेदन देऊन धडक मोर्चाचा इशारा देण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि नागरिकांना तातडीने उच्च दर्जाचे धान्य उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिंतूर तालुका अध्यक्ष मंचक देशमुख, उपाध्यक्ष भागवत चव्हाण, सचिव सचिन रायपत्रीवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता या निर्दयी पुरवठा विभागावर कारवाई होणार की नेहमीप्रमाणे कागदी घोडे नाचवून नागरिकांचे आरोग्य धोक्यात घालणार, याकडे सर्व जिंतूरकरांचे लक्ष लागले आहे!

मानसिक आरोग्यासाठी 'मेंटल हेल्थ वीक 2026' चे आयोजन; विविध स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शहरातील डॉ. ए. ए. कादरी मेंटल हेल्थ सेंटरच्या वतीने मानसिक स्वास्थ्य सेवा आणि जनजागरूकतेचा प्रसार करण्यासाठी 'मेंटल हेल्थ वीक २०२६' चे आयोजन छत्रपती संभाजीनगर येथे ५ ते १० ऑक्टोबर या कालावधीत करण्यात आले आहे. जागतिक मानसिक स्वास्थ्य दिवस दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो आणि यंदा २०२६ चा हा कार्यक्रम जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) "Lived Experience Heard – Real Voice, Real Change" या यंदाच्या थीम अंतर्गत आयोजित केला जात असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

या वार्षिक उपक्रमांतर्गत ५ ते १० ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांसाठी जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या कार्यक्रमाची विस्तृत समय-सारणी जाहीर करण्यात आली असून, ५ ऑक्टोबर रोजी वाद-विवाद स्पर्धा, ६ ऑक्टोबर रोजी पोस्टर मेकिंग स्पर्धा, ७ ऑक्टोबर रोजी ड्रामा स्किट स्पर्धा, ८ ऑक्टोबर रोजी वक्तृत्व स्पर्धा, ९ ऑक्टोबर रोजी रील्स स्पर्धा पार पडणार आहेत. तसेच १० ऑक्टोबर रोजी जागतिक मानसिक स्वास्थ्य दिवसानिमित्त 'खुशियाँ' कार्यक्रम आणि पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या विविध स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मानसिक स्वास्थ्य, मानसिक आजाराशी जोडलेले कलंक, भावनिक स्वास्थ्य, नातेसंबंध, जबाबदारी आणि स्वस्थ समाजाच्या निर्मर्णाशी संबंधित आपले विचार व्यक्त करण्याची मोठी संधी मिळणार आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे १० ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध कथाकार आणि स्टोरी आर्कियोलॉजिस्ट लक्ष महेश्वरी यांचा 'खुशियाँ' हा विशेष कार्यक्रम होणार आहे. ते आपल्या विशिष्ट कथा सांगण्याच्या शैलीतून खुशी, मानवी भावना, नातेसंबंध, जीवनाचे अनुभव, आत्मचिंतन आणि मानसिक स्वास्थ्याशी जोडलेल्या प्रेरणादायी कहाण्या व विचार सादर करणार आहेत. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन पडेंगाव, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. ए. ए. कादरी के मेंटल हेल्थ सेंटरतर्फे करण्यात आले आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911